# चारित्र्यहीन शिक्षण : एक सामाजिक शाप

**प्रा. बाळासाहेब विठ्ठलराव तौर**

सहाय्यक प्राध्यापक आणि विभाग प्रमुख समाजशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंकुशनगर, ता. अंबड,
जि. जालना – ४३१२१२,
९४०३८८९२१९,
balrajetaur100@gmail.com

## गोषवारा –

ब्रिटिशांपासून आपण साहेबी परंपरा स्वीकारली आणि सोयीस्कररित्या ती जोपासली. गल्लोगल्ली आणि घरोघरी साहेब निर्माण झाले. पोशाखी पंडित यांचीही त्यातभर पडली. प्रत्यक्ष काम अथवा श्रम करणे म्हणजे कमीपणा, हे त्या परंपरेचे सूत्र. खरे तरी त्याचे मूळ केवळ इंग्रजांच्या वर्चस्वाच्या परंपरेत आहे असे म्हणणे ही तितके बरोबर नाही. ब्रिटिशपूर्व काळात ही आपल्या देशातल्या तथाकथित पंडितांनी आणि धर्ममार्तंडांनी बुद्धी आणि श्रम यांची फारकत केली. त्या आधी भारतात श्रमाला प्रतिष्ठा होती. विद्वान व कारागिर यांच्या मध्ये संपर्क होता. विज्ञान व कला यांची जोपासना होत होती. ताम्रपाषाण युगाच्या प्रगतीची पूर्वपीठिका होती आणि त्यानंतर ही पोलाद उत्पादनाची प्रक्रिया व त्या संबंधीचे शोध, जस्त शुद्ध करण्याची पद्धत, दशांश पद्धत, शून्याची कल्पना, हस्तकला व हस्त कौशल्य या नानाविध बाबतीत भारतात प्रगती झाली होती. कापड विणण्याची कला विलोभनीयरित्या विकास पावली होती. इतकेच नाही तर पुरातन काळात रोगनिदान उपचार याबाबतीतही शास्त्र विकसित झाल्याचे आपणास वाचावयास मिळते.

---

वरील स्थितीत समाज एक प्रकारे एकसंघ होता तथापि समाजाच्या सुस्थितीचे हे पर्व लवकर संपले. तथाकथित धर्ममार्तंडांनी विव्दानाची व समाज धुरिणांची जागा घेतली. त्यांना अहंकार निर्माण झाला. केवळ पुरातन कल्पना, परंपरा व तथाकथित ज्ञान यांची जोपासना करण्याची संकुचित कल्पनाच ते उराशी बाळगून बसले. समुद्र पर्यटनावर त्यांनी बंदी घातली. त्यामुळे जगाचा संपर्क तुटला. जातीपातीच्या उतरंडी रचनेची नसती उठाठेव शूद्रांना शिक्षणाचे दरवाजे बंद करणारी ठरली. स्त्रियांनाही क्षेत्राप्रमाणेच तुच्छ लेखले. दोघांचीही गणना त्यांनी जनावरांच्या बरोबरीने केली. शूद्र व स्त्री यांच्या दास्याची वाटचाल पुढे चालत राहिली. कोणत्या जातीने काय काम करावे, याच्या चर्वितचर्वणात हे धर्ममार्तंड दंग झाले. परकीय गुलामगिरी चीड यांच्यात निर्माण झाली नाही. विज्ञान युगाच्या काळात या महाभागांना जाग आली नाही. ‘धर्म आणि विज्ञान’ हे भिन्न आहेत, असे गॅलिलियो युरोपमध्ये सांगत होता. पण या धर्ममार्तंडांच्या ते गावीही नव्हते, इतकेच नव्हे तर त्यानी त्याचा छळ केला. येथेही ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांचा छळ झाला. हा खरा प्रत्यक्ष ज्ञानाचा छळ होताच पण जातीपातीच्या उच्चनीचतेच्या विषारी विकृतीची ही ही जोपासणा होती. कर्मठ धर्ममार्तंडाच्या उण्मत सत्तेचा समाजावर पगडा बसला होता. या परंपरेच्या पगड्यातून आजही आपली शिक्षण पद्धती पूर्णपणे मुक्त झालेली नाही. स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके विमुक्त व इतरही गरीब श्रमजीवी आजही शिक्षणापासून वंचितच आहेत. ज्ञान-विज्ञानाची त्यांची गाठ पडायला अजूनही किती पिढ्या जातील हा संशोधनाचा विषय ठरेल. त्यातच ग्रामीण आणि शहरी,

धनाडे आणि निर्धन अशा विभागणीची दरी शिक्षण क्षेत्रात अधिकच रुंदावत आहे. स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्षाचा काळ जाऊन आमच्या शिक्षणाची ही अवस्था. पण त्याबाबत फारशी खंत आम्हाला नाही हा मोठा धक्कादायक दैवदुर्विलास आहे. म्हणूनच प्रस्तुत "चारित्र्यहीन शिक्षण : एक सामाजिक शाप" या संशोधन लेखां मध्ये आजच्या शिक्षण व्यवस्थेमधील विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक आणि संस्थाचालक आणि त्याची सामाजिक जबाबदारी किंवा सामाजिक भान या बाबीवर चिंतन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

मुख्यशब्द -

चारित्रहीन, शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक-प्राध्यापक, संस्थाचालक.

## प्रस्तावना –

मानवी जीवन व शिक्षण यांचा संबंध अत्यंत घनिष्ट आहे. शिक्षण हे मानवी विकासाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. शिक्षणाद्वारे विकास व विकासाद्वारे शिक्षण. या समिश्र प्रक्रियेतून मानवी जीवनाचा प्रवास पुढे जात असतो. शिक्षणामुळे मानवी जीवनामध्ये उत्क्रांती घडून आलेले आहे. शिक्षणामुळे रूढी, प्रथा, परंपरा, अस्पृश्यता, गुलामगिरी या समस्या संपुष्टात येऊन प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मानाने जगता येते आणि कुटुंब समाज व देशाचा विकास होतो. शिक्षण आणि विकास अनन्य प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे व्यक्तींच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा सर्वोच्च आविष्कार होतो. शिक्षण हे केवळ जीवनाला आकार देत नाही तर जीवनातील समस्यांची सोडवणूक देखील करते. शिक्षणामुळे मानवाचे नवीन विचार प्रगल्भ होतात. मानवी जीवनावर सुसंस्कार करून ते अधिक सहेतुक सुखी व समृद्ध बनविणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. उदान्त विचाराने वागणारी चांगली माणसे तयार करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश प्लेटो या तत्त्ववेत्त्यांनी सांगितला. मानवी जीवनात नैतिकतेला अनन्य साधारण महत्व आहे. चारित्र्याविणा शिक्षण याला महात्मा गांधीनी सामाजिक पापांच्या जंत्रीत समाविष्ट केले आहे. चारित्र्य आणि शील जोपसनारे शिक्षण आवश्यक आहे. नीतिमान समाज त्यातून निर्माण झाला पाहिजे. नीतिमान समाज नीतिमान शिक्षण तज्ञ, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, शिक्षक आणि तशाच नीतिमत्तेच्या वारसा घेतलेले विद्यार्थी हीच जगातील स्पर्धेला सामोरे जाण्याचे महत्वाची शक्ती, शक्तिस्थाने भविष्यात असतील परंतु भारतीय शिक्षण पद्धतीचा विचार करता ती परंपरेच्या पगड्यातुन आजही पूर्णपणे मुक्त झालेली दिसत नाही. स्त्रिया, दलित, आदिवासी, भटके-विमुक्त आजही शिक्षणापासून वंचित असलेल्या आपल्याला दिसून येतात. आजच्या शिक्षण व्यवस्थेतील विद्यार्थी, शिक्षक-प्राध्यापक तसेच संस्थाचालक यांना सामाजिक जबाबदारी अथवा सामजिक भान राहिलेले आपल्याला आज दिसुन येत नाही. स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्षाचा काळ जाऊनही शिक्षणाची अवस्था पण त्यावर फारशी खंत आम्हाला नाही हा मोठा दैवदुर्विलास आहे. म्हणूनच प्रस्तुत अध्ययना मध्ये "चारित्रहीन शिक्षण : एक सामाजिक शाप" हा अध्ययन विषय निवडून आजच्या शिक्षण व्यवस्थेतील विद्यार्थी, शिक्षक-प्राध्यापक तसेच संस्थाचालक यांची सामाजिक जबाबदारी अथवा सामजिक भान या अनुषंगाने चिंतन करण्यात आले आहे.

## अध्ययन विषयाचे महत्व –

शिक्षणातून सुजान, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक तयार होवा या बाबीला पहिला क्रम द्यावाच लागेल. विद्यार्थी त्या त्या विषयात उत्तम तऱ्हेने पारंगत असावा हा महत्त्वाचा तथापि नंतरचा क्रम. चारित्र्याच्या अरिसटात आपला देश सापडला आहे. यातून बाहेर पडण्यासाठी जे सामर्थ्य पाहिजे ते शिक्षणातूनच निर्माण होऊ शकेल. यासाठी वैचारिक परिवर्तनाची गरज आहे. देशाची व समाजाची भूक विचारवंतच भागू शकतील. या विचारवंतांना देखील चारित्र्य आणि नीती यांची भक्कम बैठक पाहिजे. शिक्षक आणि प्राध्यापक यांच्यावरच विचारवंतांची भूमिका पार पाडण्याची जबाबदारी आहे. समाजात जिवंतपणा यावा, चैतन्य यावे आणि त्याची प्रगती व्हावी म्हणून सर्व नैतिक मूल्यांचे महत्त्व ओळखता येण्याजोगी परिस्थिती आपणास निर्माण करावयाची आहे. याच विचाराने नैतिकतेची प्रेरणा विद्यार्थी, शिक्षक-प्राध्यापक आणि संस्थाचालक यांच्यामध्ये निर्माण होणे जरुरी आहे म्हणून प्रस्तुत अध्ययनाला खूप महत्त्व आहे.

## अध्ययन विषयाचे उद्दिष्टे –

1. आजचे शिक्षण व विद्यार्थ्यातील सामाजिक जबाबदारी यांचा सहसंबंध तपासणे.
2. शिक्षक आणि प्राध्यापक यांची सामाजिक जबाबदारी अभ्यासणे.
3. संस्थाचालक व त्यानची सामाजिक जबाबदारी यांचा सहसंबंध अभ्यासणे.

## संशोधन पद्धती –

प्रस्तुत "चारित्रहीन शिक्षण : एक सामाजिक शाप" या अध्ययनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला असून. सदरील विषयाच्या संदर्भातील तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला आहे. त्यामध्ये अनेक संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, पाक्षिके, संकेतस्थळे, वर्तमानपत्रे इत्यादीचा उपयोग करून अध्ययन विषयाशी संबंधित तथ्याचे संकलन करण्यात आले आहे.

## विश्लेषण –

१ . आजचा विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक होवा. ही किमान अपेक्षा शैक्षणिक कौशल्य हा दुसरा भाग. सामाजिक जबाबदारीची जाणीव सुशिक्षित व्यक्तींना असायला हवी. रस्त्यात पायी अथवा स्वतःच्या वाहनांनी जातांना बस, रेल्वे इत्यादी वाहनातून प्रवास करताना, सिनेमा, नाट्यगृह, सार्वजनिक सभा समारंभ इत्यादी ठिकाणी विद्यार्थी कसे वागतात? विशेषत: जमावाने असताना कसे वागतात, या विषयी चर्चा होणे जरुरीचे आहे. आजच्या शिक्षणातून आम्ही त्यांची काय तयारी करून घेतो याचे उत्तर आमच्याकडे नाही.

विद्यार्थ्यांनी हुंडा घेऊ नये व हुंडाबळीचे प्रकार सुशिक्षित व्यक्ती पुरते तरी थांबावेत. स्त्रीला समानतेची वागणूक मिळावी व मानाचे स्थान असावे या बाबत शिक्षणाद्वारे संस्कार करणे अतिशय महत्त्वाचे आहे. मुलगी व मुलगा यांच्यात फरक न करण्याची वृत्ती लहानपणापासून रुजविली पाहिजे. जातपात व धर्मभेद न मानता आणि स्त्रियांना कमी न लेखता सर्वांना समान लेखण्याचा विचार शिक्षणातून रुजविला जाणे अतिशय जरूरीचे आहे.

देशापुढे आरोग्याची फार मोठी समस्या आहे. आरोग्याचा प्रश्न नुसता औषध उपचार या पुरता मर्यादित नाही. स्वच्छता व योग्य आहार या महत्त्वाच्या बाबी आहेत. प्रदूषणाचा प्रश्न याच्याशी निगडित आहे.

वृक्षवल्लीची जोपासना व्हावयाची तर एकूण निसर्गावर प्रेम करण्याची धारणा वाढविणे अत्यावश्यक आहे. पर्यावरणविषयक जाणीव घेऊन निसर्गसंपन्न कसा होईल याविषयी असता निर्माण झाली पाहिजे. पिण्याचे पाणी, खाण्याचे अन्न आणि हवा स्वच्छ पाहिजे. ही जाणीव आजच्या शिक्षणातून खऱ्या अर्थाने यावयाला पाहिजे. आहार कोणता पोषक आणि कसा घ्यावा याविषयी समाजात डोंगराएवढे अज्ञान आहे. याबाबत विद्यार्थ्यात अभ्यासपूर्वक जाण मुळीच निर्माण केली जात नाही. अभ्यासक्रमदेखील या बाबींचा जाणीपूर्वक समावेश केलेला दिसत नाही. व्यायामा बाबत थोड्याफार प्रमाणात हेच म्हणावे लागेल. आपल्या शरीराची काळजी कशी घ्यावी याची याचे शिक्षण आमच्या शिक्षण पद्धतीत खऱ्या अर्थाने मिळत नाही. या सर्व बाबीसंबंधी गांधीजींनी सखोल विचार मांडला. आपण त्याबाबत राष्ट्रपित्यापासून काही शिकण्याचा प्रयत्न केलेला नाही. शिक्षण पद्धती ही मोठीच उणीव आहे.

लोकसंख्येची समस्या देशाला राक्षसा सारखी भेडसावीत आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे गृहस्थाश्रमी आहेत. त्यांना याबाबत शिक्षण घेऊन जागृत करणेही महत्त्वाचे आहे. आपल्या शिक्षण पद्धतीत या विषयाचा देखील समावेश नाही. वरील विश्लेषणावरुन आजचे शिक्षण हे विद्यार्थ्यामध्ये सामाजिक जबाबदारीचे भान निर्माण करण्यात अपयशी ठरत असल्याचे दिसुन येते. ही देखील चिंतेची बाब आहे.

२. प्राथमिक शिक्षणापासूनच खरया विद्याअभ्यासाची आणि संस्कारशीलतेची सुरुवात होते. निकोप प्रवुती आणि वेगळी दृष्टी घेऊन मुले आलेली असतात. जगाची खूप काही माहिती मिळवावयाची असते. जिज्ञासा, ज्ञानलालसा असते. ही महान ज्ञानलालसा भागवायला शिक्षक ही महान ज्ञानी पाहिजे. तथापि आपली प्राथमिक शिक्षकांची निवडच मुळी अगदी जुजबी कसोट्यावर असते. आपल्या प्राथमिक शिक्षणाइतकी आबाळ शिक्षणाच्या कोणत्याही स्तरावर नसेल. आपण प्राथमिक शिक्षणाची एक प्रकारे बेकार अवस्था करून टाकली आहे. मुले या शिक्षणाचा केंद्रबिंदू आहेत या जाणिवेने शिक्षणक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी पाहिजे, ही बाब आमच्या शिक्षण पद्धतीच्या ध्यानीमनीही नाही. लहान लहान मुलांना दप्तराचे ओझे वाहणारे आणि शाळेचे चरकात घातलेले हिन-दीन बालक आपण बनविले आहे. काही शिक्षक व शिक्षिका या लहान वयाच्या कोवळ्या मुलांना मारतात मुलांना असे शिक्षक साक्षात कर्दनकाळ वाटतात. त्यांच्या मनावर त्याचा दूरगामी व भयावह असा विपरीत परिणाम होतो. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकही याला अपवाद नाहीत. या एकूणच शिक्षण पद्धतीत मुलांचा आनंद, हास्य आणि जिज्ञासा मावळल्या जातात. शाळा म्हणजे त्यांना एक तरुन्ग वाटतो. शाळेत जायला मुले उत्सुक नसतात. सुट्टी मिळाली की त्यांना खूप आनंद होतो. हाच आपल्या शिक्षण पद्धतीचा मोठा पराभव आहे.

प्राध्यापकांच्या कामाच्या तासांची मोजदात करताना एक तास वर्गात घ्यावयाचा असल्यास दोन तास तयारी करण्यासाठी लागतात, असे सूत्र गृहीत धरून त्यांच्या कामाच्या तासिकांची संख्या ठरविली आहे. वास्तवात तयारीसाठी प्राध्यापक किती वेळ मनोभावे देतात याचे उत्तर प्राध्यापकांवर सोपलेले बरे. ज्यादा कामाच्या प्रस्तावाला प्राध्यापकांच्या संघटनेने विरोध केला. दीर्घकालीन संप घडवून आणला पण या संघटनांना प्राध्यापकांची पाठाची तयारी किती, व्यासंग आणि कर्तव्यदक्षता किती यासंबंधी आस्था दर्शविली असल्याचे दिसून येत नाही. इतकेच नाही तर प्राध्यापकांच्या कामांचे परीक्षण व्हावे यालाही आक्षेप घेतला जातो.

अनुदानाच्या साहाय्याने महाविद्यालयात चांगली ग्रंथालय उभे राहतात. त्यातील ग्रंथांचा व्यासंग म्हणून वापर किती होतो हे सर्वांना यातच आहे. शिक्षक, प्राध्यापक जर खरोखर कर्तव्यतत्पर आणि व्यासंगी असतील तर खाजगी शिकवण्या व खाजग़ी वर्ग यांचा बाजार एवढा भरभराटीला आलाच नसता. प्राथमिक शिक्षकांपासून ते महाविद्यालय प्राध्यापकापर्यंत असलेल्या संघटना त्यांच्या कामातील क्षमता, गुणवत्ता आणि समर्पित भावना याबाबत आस्था दाखवत नाही, हे कटू सत्य आहे. आपल्या हक्काबद्दल जागरुक असलेल्या शिक्षक-प्राध्यापक संघटना या प्रश्नासंबंधी काही विचार आणि नेतृत्व द्यायला तयार आहेत का, याचे उत्तरही अशा संघटना कडून अपेक्षित आहे. आपले कर्तव्य पार पाडताना आपल्या विद्यार्थ्यांनी उद्याचे जबाबदार नागरिक हावे या विचाराने प्रेरित होऊन किती शिक्षक-प्राध्यापक काम करतात? या संबंधित आपल्या कर्तव्याबाबत शिक्षक-प्राध्यापक यांनी आत्मपरीक्षण करणे जरुरी आहे. यात शिक्षक-प्राध्यापकांच्या वर्तनाचा समावेश व्हायला पाहिजे. आपल्या चारित्र्याचे व नीतिमत्तेचे धडे विद्यार्थी पाठ्यपुस्तकातून नव्हे तर आपल्या शिक्षकांच्या वागण्या-बोलण्यातून घेत असतात, याचे भान शिक्षक प्राध्यापकांना असले पाहिजे. पण आजच्या शिक्षक-प्राध्यापकामध्ये हे भान फारच कमी असल्याचे दिसुन येते.

३. अनेक शिक्षणसंस्थांचे चालक कसे आहेत हा देखील परीक्षणाचा विषय आहे. शिक्षण संस्थांमधील गटबाजी, भ्रष्टाचार, सत्तास्पर्धा इत्यादी गैरप्रकार वाढत आहेत. नीतिमत्ता आणि गुणवत्ता याबाबत शिक्षण संस्थांची विश्वासार्हता देखिल कमी झाल्याचे दिसून येते. अनेक ठिकाणी वैयक्तिक स्वार्थ व राजकीय हेतूसाठी संस्थेला राबविण्याची प्रवृत्ती चालकात दिसून येते. ठराविक व्यक्तीचे अथवा गटांचे हितसंबंध जपण्यासाठी संस्था वेठीला धरल्या जातात. निकोप शिक्षण संस्था ही आजच्या काळाची नितांत गरज आहे. शिक्षणसंस्थांचा एकूण कारभार यासंबंधी संस्थाचालक आत्मपरीक्षणाला कितपत तयार होतील? सरकारी अंकुश बोथट व गुळगुळीत झालेला आहे. इतकेच नव्हे तर बऱ्याच ठिकाणी सरकार व संस्था चालक यांची गैरप्रकारातसंबंधी हातात हात घालून वाटचाल चालू आहे. मातब्बर व्यक्ती संस्थेच्या प्रमुखपदी आहेत आणि विवेकशील लोकमतचा प्रभाव विकलांग झालेला आहे. सरकारी नियंत्रणाच्या अतिरेकाने शिक्षणक्षेत्रात स्वयंप्रेरणेनेला खिळ बसते हा एक विचार. दुसऱ्या बाजूला शिक्षण क्षेत्रात स्वायत्तता आणि तांत्रिक व वैद्यकीय शिक्षणाला संधी देण्याच्या नावाखाली विनाअनुदानित तत्त्वावर शिक्षण संस्था काढण्याचे जणू पेवच फुटले आहे. सरकारकडून एक प्रकारे उघड-उघड अशी खिरापत वाटली जात आहे. शिक्षणाचा बाजार मांडला, शिक्षणाचा धंदा झाला, बेहिशोबी पैसा मोठ्या प्रमाणावर जमा होऊ लागला अशी उघड टीका सरकार आणि अशी संस्था काडणारी मंडळी उघड्या कानाने ऐकून सोयीस्कररित्या गप्प बसून आहेत. अशा गैरप्रकारांना क्वचित काही संस्थाचालक अपवाद असतीलही पण विनाअनुदानाने शिक्षण क्षेत्रात लाचारीचे व भ्रष्टाचारा चे युग अवतरल्या सारखे झाले आहे. भ्रष्टाचाराला राजमान्यता मिळाली आहे.

### निष्कर्ष व सारांश

यावरून आपल्या शिक्षण पद्धतीच्या भवितव्याविषयी आपल्याला बोध घेता यावा. वरील भागात विद्यार्थी, शिक्षक-प्राध्यापक, संस्थाचालक यांच्याविषयी उणिवा दर्शविणारी माडणी केलेली आहे. केवळ एकांगी असे विश्लेषण असे त्यावर टीका होण्याची शक्यता आहे. चांगले विद्यार्थी, चांगले शिक्षक-प्राध्यापक, चांगले

संस्थाचालक आणि चांगल्या शिक्षण संस्था नाहीत असा विचार मात्र मुळीच नाही. तथापि ही संख्या अगदीच नगण्य आहे. आजच्या शिक्षणासंबंधीचे विचार यात अभ्यासक्रम, विषय, परीक्षापद्धती, परीक्षांचे निकाल, अध्ययन-अध्यापन पद्धती गृहपाठ, खाजगी शिकवणी वर्ग या व अशा अनेक बाबींविषयी तपशील नाही. अशी टीका टिप्पणी होणे सहाजिक आहे. तसेच सर्वच सामाजिक समस्या जणूकाही शिक्षणाच्या माध्यमातूनच सोडविता येतील असाही मुद्दा लिखाना यासंबंधीं उपस्थित होण्याची संभावना आहे. आजच्या शिक्षणाच्या प्रश्नांच्या व्याप्तीची मला ही जाणीव आहे. लेखात दर्शविलेल्या अनेक समस्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभूमी आहे याचीही जाणीव आहे. तथापि आपल्या कक्शेपर्यंत का होईना शिक्षणक्शेत्राने आपली जबाबदारी उचलली पाहिजे. इतर सबबींचे पर्यवसान आपली जबाबदारी टाळण्यात होऊ नये असे मात्र आग्रहाचे प्रतिपादन या विचारात आहे.

**संदर्भ सूची** –


1. शिंदे रावसाहेब, (२०१०), “शिक्षण आणि समाज”, अमेय प्रकाशन, पुणे.
2. वाघमारे जनार्धन, (२०१२), “लोकशाही आणि शिक्षण”, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
3. भगत रा. तू. आणि कुलकर्णी विशंभर, (२००८), “पाश्चात्य शिक्षणातील विचारवंत”, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
4. दुखाने अरविंद आणि देशपांडे लिला, (२००७), “प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र”, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
5. दिवेदी सीमा, (२००८), “वर्तमान शिक्षा नीति स्वरूप येऊ संभावनाए”, साहित्य नीलम प्रकाशन, कानपूर.
6. शेख फारुख (संपादित), (२०१३), “आर्थिक विकास एक चिंतन”, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
7. कापरे आनिता आणि भुते स्नेहल, (ऑक्टोंबर-डिसेंबर- २०१६), “अक्षरवेल”, परिवर्तन प्रशिक्षण केंद्र, पुणे, त्रिमासिक, अंक-०३रा.
8. कांबळे नारायण, (मार्च – २०१५), “महाराष्ट्रातील उच्च शिक्षण आणि बेरोजगारी”, विशेषांक, शिक्षण आणि समाज, मराठी समाजशास्त्र परिषद, अंक-१९वा.